# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 13/04/2023 (गुरूवार) दुपार

## नागपूर ग्रामीण पोलीसांची
## अवैध दारू धंदयाविरूद्ध विशेष मोहीम

मा. पोलीस अधीक्षक श्री. विशाल आनंद नागपूर ग्रामीण यांनी दिलेल्या आदेशावरून नागपूर ग्रामीण अंतर्गत येणाऱ्या विविध पोलीस स्टेशन येथील अधिकारी व अंमलदार व स्थानिक गुन्हे शाखा येथील पथक यांचे पथक तयार करून विशेष मोहीम यांची अवैध दारू संदर्भात विशेष मोहीम राबवून दिनांक ०३/०४/२०२३ ते दि. १३/०४/२०२३ पर्यंत जिल्हयातील विविध ठिकाणी अवैध दारू भट्टीवर छापे मारून अवैध दारू विक्री करणाऱ्यांवर तसेच भट्टीवर दारूबंदीच्या एकुण २३५ केसेस करण्यात आल्या असुन आरोपीतांकडुन सुमारे ३०,००,०००/—रूपयाचा मुद्देमाल जप्त करून नाश करण्यात आला आहे. त्यामध्ये विशेष करून गोंडखैरी येथील कारवाईचा सुद्धा समोवश आहे. या कारवाई दरम्यान कच्चे रसायन सडवा, दारूभट्टीसाठी लागणारे एकुण सांहित्य दारू तयार करणेकामी लागणारे साहीत्य जप्त करून गावठी दारूच्या भट्टया उद्धवस्त करण्यात आल्या आहे. अशा प्रकारची मोहीम यापुढेही सतत चालु राहणार असल्याबाबत पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण श्री. विशाल आनंद यांनी सर्व ठाणेदारांना सांगितले आहे.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर